**मजकुर :—**

दिनांक २२/०८/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे जुन —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुन —२०२३

| | | |
|---|---|---|
| ०१ | **डॉ.दा.भ.मार्ग, पोलीस ठाणे, परिमंडळ—०२ मुंबई** | **गु.र.क्र. १६२/२३ कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भा द वि** |

—: " **दिवसा रात्रौ घरफोडी** ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयांत फिर्यादी श्री. मनोज सुरजमल बोकाडीया वय २९ वर्षे, हे दिनांक २२/०६/२०२३ रोजी संध्याकाळी ०७.३० वा ते दिनांक २४/०६/२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या दरम्यान देवदेर्शनाकरिता राजस्थान येथे गेलेलो असताना, अज्ञात इसमांनी बिल्डिंगच्या बाहेरील बाजुच्या डकमधुन येवुन घरातील बाथरूमची बंद असलेली खिडकी उघडुन घरामध्ये प्रवेश केला व फिर्यादीच्या बेडरूमच्या कपाटातुन सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकुण रूपये २०,६१,०००/— ची मालमत्ता ही फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने अज्ञात इसमाने चोरी केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.मनोज सुरजमल बोकाडीया वय २९ वर्षे, |
| चोरीस गेलेला माल | :— | १) सोन्याची कानातील रिंग ०२ अं.कि.१२०००/—रू.<br>२) ०५ तोळे वजनाचे सोन्याचे कडे अं.कि. २,५०,०००/—रू<br>३) ०१ तोळयाची सोन्याची चैन अं.कि.५०,०००/—रू.<br>४) लेडीज सोन्याची चैन अं.कि.१५०००/—रू.<br>५) मोजेनाईट चैन अं.कि.१००,०००/—रू<br>६) दोन डायमंडच्या बांगडया अं.कि.५००,०००/—रू.<br>७) ०५ तोळयाच्या सोन्याच्या ०२ बांगडया अं.कि.२, ५०,००० / —रू<br>८) अमेरीकन डायमंडची कानातील रिंग सेट अं.कि ९५०००/ — रू.<br>९) ०४ तोळयाच्या दोन पातळ बांगडया अं कि.२००,००० /—रू.<br>१०) अमेरिकन डायमंडच्या ब्रेसलेट अं.कि.७५०००/—रू<br>११) डायमंडचे मंगळसुत्र अं.कि.१,२५०००/—रू<br>१२) हातातील मंगळसुत्र अं.कि.२५०००/—रू.<br>१३) दोन व्हाईट गोल्ड रिंग अं.कि.१,४५०००/—रू<br>१४) ०४ सोन्याच्या रिंग अं.कि.१,६९०००/—रू.<br>१५) भारतीय चलनाती रोख रक्कम ५०,०००/—रू<br>**एकुण अं.कि.२१,१११,००/ —रू.**<br>फिर्यादीच्या पुरवणी जबाब अंतर्गत वाढ करण्यात आलेली मालमत्ता<br>१) सोन्याची कानाची रिंग्ज ०१ सेट अं.किं. १५०,०००/—रू<br>२) सोन्याचे हातातील बाजुबंद अं.कि. १,७५०००/—रू<br>३) सोन्यायाचा कडा ०१ अं.कि.९५०००/—<br>**एकुण अं.कि.२,५३१००/—रू** |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) पिवळया धातुची कानातील रिंग ०२अं.कि.१२०००/—रू.<br>२) ०१ पिवळया धातुची चैन अं.कि.५०,०००/—रू.<br>३) लेडीज पिवळया धातुची चैन अं.कि.१५०००/—रू.<br>४) पिवळया धातुची मोजेनाईट चैन अं.कि.१००,०००/—रू<br>५) दोन हिरे सदृश्य बांगडया अं.कि.५००,०००<br>**एकुण अंदाजे किंमत ६,७७,०००/—रू**<br>१) हातातील मंगळसुत्र अं.कि.२५०००/—रू.<br>२) दोन व्हाईट गोल्ड रिंग अं.कि.१,४५०००/—रू<br>३) ०४ सोन्याच्या रिंग अं.कि.१,६९०००/—रू.<br>४)०५ तोळयाच्या सोन्याच्य ०२ बांगडया अं.कि. २,५०,००० /—रू<br>५) ०४ तोळयाच्या दोन पातळ बांगडया अं.कि.२००,०००/—रू<br>६) १० ग्रॅम चांदीचे ३ स्केअर शिक्के अं.कि.५००/—रू. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) एक पिवळया रंगाचे घडयाळ अं.कि. ३००/—रू<br>**एकुण अंदाजे किंमत ८,३९,८००/—रू**<br><br>१) हिरे सदृश्य खडे असलेले कानातील रंग सेट अं.कि.९५०००/—रू.<br>२) हिरे सदृश्य खडे असलेले ब्रेसलेट अं.कि.७५०००/—रू<br>३) हिरे सदृश्य खडे असलेले मंगळसुत्र अं.कि.१,२५०००/—रू<br>४) पिवळया धातुचा एक कडा अं.कि. २,५०,०००/—रू<br>५) हिरे सदृश्य खडे असलेली एक जोड रिंग अं.कि.१०,०००/—रू.<br>६) पिवळया धातुची गळयातील लहान मुलाची चैन अं.कि.१०,०००/—रू.<br>**एकुण अंदाजे किंमत ५,६५,०००/—रू**<br>१) सोन्याची कानाची रिंग्ज ०१ सेट अं.किं. १५०,०००/—रू<br>२) सोन्याचे हातातील बाजुबंद ० अं.कि. १,७५०००/—रू<br>३) सोन्यायाचा कडा ०१ अं.कि.९५०००/—रू<br>**एकुण अंदाजे किंमत ४,२०,०००/—रू**<br>**एकुण अं.कि. २५,०१,८००/—रू सोन्याचे दागिने** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) राजेश गंगाराम गावसकर वय ३० वर्षे<br>२) सलीम जुम्मन शेख वय २४ वर्षे<br>३) बेलाल सिराज अहमद वय २० वर्षे<br>४) हिना सलीम शेख वय १९ वर्षे<br>अटक दिनांक — २६/०६/२०२३ |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हा घडल्यानंतर मा.वरिष्ठांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने तात्काळ पोलीस ठाण्यातील कार्यरत अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सुचना केल्या व गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस पथकाची नेमणुक केली. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा पोलीस निरीक्षक राजाराम पोळ व पथक यांनी गुन्हयाच्या घटनास्थळाच्या तारा मेन्शन या बिल्डींगचे सी.सी. टी.व्ही फुटेज तपासले असता तसेच सदर परिसरात असणा—या सी.टी.सर्वेलाईन्स च्या कॅमे—याची पाहणी केली असता नमुद गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीने कोणतीही उपयुक्त महिति मिळुन येत नव्हती. तसेच सदर घटना ही तारा मेन्शन बिल्डींगच्या १७ वा.मजला याठिकाणी घडला असल्याने तसेच रात्रीच्या वेळी पाऊस व अंधार असल्याने सोसायटीच्या सी.सी.टी.व्ही फुटेज मधुन कोणतीही उपयुक्त महिति मिळुन येत नव्हती. गुन्हा घडुन ०२ दिवस उलटुनही गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीने कोणीतीही उपयुक्त महिति मिळुन येत नव्हती.

नमुद गुन्हयातील तारा मेन्शन ही बिल्डींग नवीन असल्याने सदर बिल्डींग च्या बऱ्याचशा रूम मध्ये फर्निचर,प्लंबीग, हाउस किपर, कारपेन्टर, चे काम चालु होते. सदर बिल्डींग मध्ये १०० ते १५० कारागीर काम करीत होते. नमुद बिल्डींग मध्ये काम करणाऱ्या १०० ते १५० हाउस किंपर, प्लबंर, कारपेन्टर, यांना पोलीस ठाणेस आणुन नमुद गुन्हा उघडकीस येण्याच्या अनषंगाने त्यांच्याकडे तपास केला तसेच नमुद गुन्हा घडल्याच्या वेळीच्या त्यांच्या हालचाली तपासल्या असता इसम राजेश गंगाराम गावसकर वय ३० वर्षे याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याच्याकडे नमुद गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीने कसुन तपास केला.

तपासात राजेश गंगाराम गावसकर वय ३० वर्षे याने नमुद गुन्हा १) सलीम जुम्मन शेख,२) बिलाल सिराज अहमद ३) हिना सलीम शेख वय १९ वर्षे यांचे मदतीने केलेचे कबुल केले. त्यानुसार वर नमुद आरोपीतांना त्यांच्या राहत्या घरातुन ताब्यात घेण्यात आले. अअक आरोपींकडे एकत्रित रित्या तपास केला असता त्यांनी नमुद गुन्हा संगनमताने केल्याची कबुल दिल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

त्यांनतर त्याच्याकडून गुन्ह्यातील सर्व चोरीस गेलेला मुददेमाल निवेदन पंचनाम्या अंतर्गत हस्तगत करण्यात आला आहे. पोलीस कोठडी दरम्यान अटक आरोपीतांकडे तपास केला असता त्यांनी तारा मेंन्शन,या बिल्डींग मधील रूम नं.१५०१ व १६०१ मध्ये ही चोरी केल्याचे हि तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांच्याकडे तपासामध्ये डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र.१६४/२३ कलम ४५४,४५७,३८०,३४ भा.द.वि तसेच गु.र.क्र.१६५/२३ कलम ४५४,४५७,३८०,३४ भा.द.वि मध्ये त्यांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. त्यामुहे त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अशाप्रकारे गुन्हयातील तपासी पथकाने गुन्हयातील आरोपीत हे अनोळखी व्यक्ती असतांना चिकाटीने विशेष तपास कौशल्याचा वापर करत सुनियोजीत पद्धतीने उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपीतांची ओळख पटविली. नमुद गुन्हयात तारा मेंन्शन बिल्डींग मध्ये असणा—या सी. सी.टी.व्ही फुटेज मधुन कोणतीही उपयुक्त माहिती मिळुन येत नसतांना अतिशय कार्यक्षमतेने व उत्कृष्ठ व कौशल्यरित्या तपास करून सदर गुन्हयात नमुद आरोपीतांना अटक करून गुन्हा उघडकीस आणला. अशा प्रकारे यातील अधिकारी व अंमलदार यांनी प्रसंशनिय व कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. विनय घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री.पांडुरंग सणस | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा.पोलीस निरीक्षक | राजाराम पोळ | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | स्वप्नील गोळे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.००१९१ | अशोक पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र.०८००६० | रामभाउ सांगळे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पो.शि.क्र.०८१२२६ | सिमा घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.०९०१९४८ | प्रकाश कोळी | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.०९२४१६ | मयुर पालवणकर | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र.०९०२८७६ | शेखर अभंग | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र.११०७१३ | दिपक डावरे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र.११०७७६ | संतोष कदम | प्रशस्तीपत्रक |
| १३ | म.पो.शि.क्र.१४२१६१ | ज्योती फडके | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २२/०८/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जुन —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब)(१) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२३

| | | |
|---|---|---|
| **०१** | **अंधेरी पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई** | **गु.र.क्र. २१२/२०१८, कलम ३०२,३४ भादवि** |

**—: '' मालमत्तेच्या वादातुन खुन '':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— श्री. सचिन देवीदास सोनमाळी, ३६ वर्षे यांनी दिलेल्या सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरून जखमी इसम अब्दुल कय्युम सय्यद, वय ५० वर्षे याचे ओळखीचा व त्याचे रुमचे शेजारील रुममध्ये रहाणारा इसम सलीम नवाब खान, वय ५८ वर्षे याने आपली दोन मुले नाजीम खान व फरहान खान यांचे मदतीने मालमत्तेच्या वादातुन धारदार चाकुने पोटावर वार करुन जीव ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा कलम ३०७,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयातील जखमी इसम उपचारादरम्यान मयत झाल्याने गुन्हयांच्या कलमात कलम ३०२ भादवि अन्वये वाढ करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सचिन देवीदास सोनमाळी, वय ३६वर्षे |
| बळीत | :— | अब्दुल कय्युम सय्यद, वय ५०वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि. ०७/०६/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) सलीम नवाब खान, वय ५८वर्षे,<br>२)नाजीम सलीम खान, वय ३०वर्षे<br>३)फरहान सलीम खान, वय २४वर्षे<br>दिनांक १६/०४/२०१८ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा.न्यायालयाने आरोपीतांना दोषी ठरवुन आजीवन कारावास व रू. ५०००/— दंडाची शिक्षा सुनावली आहे. अशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमूद गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी सदर आरोपीतांना अटक करून त्यांचा गन्ह्यातील सहभाग निष्पन्न करून त्यांचेविरूध्द दोषारोप पत्र सादर केले. नमुद खटला बोर्डावर आल्यानंतर मा. न्यायालयाच्या आदेशान्वये गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी व इतर एकुण १३ साक्षीदार तपासणी करण्यात आली. तसेच तांत्रिक तपासमधील साक्षीदार तसेच तांत्रिक पुराव्याची पूर्तता केली.

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई. न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | संताजी घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | शिवाजी पावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | सुरेश सहाणे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहायक पोलीस निरीक्षक | अजय कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.३०७४९ | साबाजी तळणकर , | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | म.पो.ह.क्र.०४.०८६२ | रूपाली महामुलकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र. ०५०३९५ | सागर भोसले, | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र. ०५०९५६ | संजय चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र. ०५.०७९३ | सचिन सोनमाळी | प्रशस्तीपत्रक |

# (ब)(२) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२३

| | | |
|---|---|---|
| ०२ | समतानगर पोलीस ठाणे, परिमंडळ—१२, मुंबई | गु.र.क्र. ४३१/२०१६, कलम ३७६, ३७७ भादवि सह कलम ४, ८, १०, १२ पोक्सो ॲक्ट |

**—: ‘‘ अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार ’’:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— दिनांक ०२/०६/२०१६ रोजी ते दिनांक २९/०८/२०१६ दरम्यान फिर्यादी श्रीमती प्रियंका धर्मेन्द्र राय,वय २८ वर्षे, या राहावयास असलेला भास्कर जंगम चाळ, पोयसर, कांदिवली याठिकाणी त्यांची बळीत मुलगी कुमारी साक्षी धर्मेन्द्र राय, वय ०७ वर्षे हीला गुन्हयातील अटक आरोपी गोपाळ उर्फ सोनु जितेन्द्र राय, वय २३ वर्षे याने फिर्यादी यांची मुलगी वयाने लहान असल्याचे माहिती असून, तसेच ती त्याच्या नात्यातील असून देखील त्याने बळीत मुलीची आई घरात नसताना वेळोवेळी फिर्यादी यांच्या बळीत मुलीशी तीच्या इच्छेविरुध्द अनैसर्गिक संभोग केला म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती प्रियंका धर्मेन्द्र राय,वय २८ वर्षे, |
| बळीत | :— | अल्पवयीन मुलगी वय ०७ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि. १९/०६/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | गोपाळ उर्फ सोनु जितेंद्र राय वय २३ वर्षे,<br>दिनांक ०४/१०/२०१६ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा.न्यायालयाने आरोपीस कलम ३७७ ला ७ वर्षे, कठोर कारावास शिक्षा व २५,०००/— दंड व दंड न भरल्यास ०६ महिने अ कारावासाची शिक्षा पोक्सो<br>कलम ६ या कलमास १० वर्षे, कठोर कारावास २५,०००/— रूपये दंड व दंड न भरल्यास ०६ महिने अ कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदरची दोन्ही सजा एकत्रित भोगण्याचे आदेश झालेले आहेत |

**तपास कौशल्य** :— प्रस्तुत गुन्हयामध्ये आरोपी याने गुन्हा घडल्यानंतर वास्तव्याचे ठिकाणहून पळ काढला होता आरोपीचे मिळालेल्या मोबाईलचे लोकेशन प्राप्त केले असता ते गांव नडवातडवा, तालुका—गोला, जिल्हा—गोरखपूर राज्य उत्तर प्रदेश असे मिळून आल्याने सदर ठिकाणी पोलीस पथक पाठवून त्यास ताब्यात घेवून अटक करण्यात आली.

त्यानंतर तपासी अधिकारी यांनी त्यांचा गन्ह्यातील सहभाग निष्पन्न करून त्यांचेविरूध्द दोषारोप पत्र सादर केले. तसेच तपासात बळीत मुलगी व अटक आरोपी या दोघांचे वैद्यकीय तपासणी करून ब्लड रासायनिक तपासणी करणेकरीता रासायनिक विश्लेषक, कालीना मुंबई येथे पाठवण्यात आला त्याचा अहवाल प्राप्त करून तो मा. न्यायालयात सादर करण्यात आला.

गुन्हयातील बळीत मुलीची मा. न्यायालयाने १६४ फौ.दं.पं.सं. प्रमाणे जबाब नोंद केल. बळीत मुलगी कुमारी साक्षी धर्मेन्द्र राय,वय ७ वर्षे हीचा प्रश्नोत्तर जबाब नोंद करून तो न्यायालयास सादर केला एकंदरीत एकत्रीत केलेल्या साक्षी पुराव्याचे आदारे आरोपी यास शिक्षा सुनावण्यात आली.

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई. न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. दिलीप यादव ( सेवनिवृत ) | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री सुधाकर रामचंद्र हुंबे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | नेत्रा मिलींद मुळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र. ३१५६६ | रविंद्र मारुती जाधव | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, डॉ. द.भ.मार्ग,पोलीस ठाणे, मुंबई Best Detection of the Month June – 2023 या करीता तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंधेरी पोलीस ठाणे व समतानगर पोलीस ठाणे, मुंबई यांना Best Conviction of the June – 2023 या करीता निवड झाल्यामुळे कळविण्यात येते की, राज्य स्तरावर प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

## Best Detection of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | Property offence बाबतीत a) गेलेला माल b) जप्त/हस्तगत केलेला माल | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे,<br>a) घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | Inquest पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | DNA टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | Cyber Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | FORENSIC Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | Dog Squad ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | Fingerprint / Handwriting Expert ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी Portrait बाबत Expert ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आलले आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023